# भारतीय संगीतात बोकाळलेली गटबाजी, बुवाबाजी आणि गुरूबाजी

अशोक दामोदर रानडे

(मूळ प्रसिद्धी - दैनिक महाराष्ट्र टाईम्स, मुंबई, १७ सप्टेंबर १९६७)

कलावंताची कला-जाणीव व सामाजिक अभिरुची या नियमनशक्तींच्या आधारे कोणत्याही समाजातील संगीतविकास होत असतो. कलावंताच्या कार्याचा व्याप, कार्याचे दीर्घकालिनत्व व मूलगामित्व यानुसार कलावंत कमीअधिक विचारार्ह ठरतो. किंबहुना असे म्हणता येईल की त्याची कलावंत म्हणून जी कदर केली जाते त्याहून वेगळी अशी महत्ता प्राप्त होण्यासाठी त्यास वैयक्तिक कलासिद्धी व व्यक्तिभूत कलाजाणीव यांचा कोश फोडून बाहेर पडावे लागते. वैयक्तिक कलासिद्धी व व्यक्तिभूत कलाजाणीव यांना सामाजिक संदर्भ देणे जरूर ठरते. यात कलावंत यशस्वी झाला तर केवळ व्यक्ती न राहता तो एक सामाजिक संस्था बनतो. सामाजिक संस्था म्हणजे समाजाच्या विशिष्ट कलाव्यवहारात प्रगमनशील हालचाल चालू ठेवणारी, त्या हालचालीस निश्चित वळण देणारी अशी एक शक्ती. संगीतक्षेत्रात गुरू ही एक संस्था ठरू शकते ती या अर्थाने. महाराष्ट्रात कलावंत झाले. त्यांपैकी काही चांगले गुरूही होते. काही जण तर कलावंत या नात्याने फार मोठे नव्हते, पण गुरू या नात्याने निश्चितपणे फार मोठे होते.

**गुरूची महत्ता**

अशा व्यक्तींचा इतिहास आपल्याला पाहावयाचा नाही, त्याचप्रमाणे ह्या वर्गात समावेश होणाऱ्या सर्व संगीतकारांचा विचारही करावयाचा नाही. काही उदाहरणांच्या आधारे गुरू हा सांगीतिक अभिरुचीचा निर्माता, नियंता कसा बनतो याचा विचार करणे ही आपल्या प्रयत्नाची दिशा आहे.

गुरू शिष्याला 'नजर' देतो असा गायनक्षेत्रातला रूढ शब्दप्रयोग आहे. नजर देतो म्हणजे काय? चांगले काय व वाईट काय, जे चांगले असेल ते चांगले का वा वाईटाचे वाईटपण कशामुळे हे सांगणे म्हणजे नजर देणे. यामुळे शिष्यात कलाजाणीवेचा उगम होतो. शिष्याचे, गायकाचे कलावंतात रूपांतर होणे न होणे हे या जाणीवेच्या अस्तित्वावर अवलंबून असते. अशी कलाजाणीव जर एखाद्या गुरूने अनेकांत निर्माण केली तर अर्थात अनेक कलावंत समाजाला उपलब्ध करून देण्यात त्याने मोठीच कामगिरी बजावली असे म्हणता येईल. कलावंतांचे अनेकत्व व एकंदर कलाव्यवहाराची संपन्नता यांचा संबंध निकटचा असतो हे मान्य करण्यास अडचण नसावी. अशा वेळी वर म्हटल्याप्रमाणे व्यक्तिगत कार्याला सामाजिक संदर्भ प्राप्त होतो. गुरू या संस्थेची महत्ता लक्षात घेण्यासारखी ठरते ती यामुळे. शिष्यांच्या वैयक्तिक आवडीनिवडीचे कलावंताच्या कलाजाणीवेत रूपांतर होणे ही क्रिया विकासशील सामाजिक अभिरुची निर्माण करण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची आहे. कारण प्रारंभी प्रतिपादन केल्याप्रमाणे कलावंताची कलाजाणीव व सामाजिक अभिरुची यांच्या प्रभावातूनच संगीतविकास होत असतो. कलावंत निर्माण होण्यासाठी एक अत्यावश्यक अशी पूर्वतयारी गुरू कशी पार पाडू शकतो हे पाहणे आवश्यक आहे.

**पहिले लक्षण**

मूलतत्त्वाविषयी आग्रह व तपशीलाविषयी लवचिक दृष्टिकोण हे चांगल्या गुरूचे पहिले लक्षण होय. उदा. अस्ताई-अंतरा असा मांडावा की त्यातून अभिप्रेत रागस्वरूप स्पष्ट व्हावे, रागस्वरूप असे मांडावे की आलाप-तान इ. सर्व अंगात ते तसेच मांडले जावे हे एक मूलतत्त्व होय. आता इतरत्र एखादी जागा विशिष्ट रागात कुठेही नसता ती ख्यालात (तीही एखाद्याच!) मात्र उपयोगात आणण्याची सक्ती करणे ही केवळ तपशीलाबाबतची हट्टी वृत्ती होय. या हट्टालाच शिष्याने पुढेही चालवीत राहायला पाहिजे

अशीही पुष्कळदा अशा गुरूंची अपेक्षा असते. रागस्वरूप ही एक लहरीनुसार बदलण्याची गोष्ट नव्हे, त्याचप्रमाणे त्यात शिरलेल्या अपभ्रंशांनाही ज्यात चिकटून राहावे अशीही काही सोवळ्यातली गोष्ट नव्हे. हे न समजून भलत्याच रूढीला चिकटून बसून आपण परंपरा पुढे चालवितो आहोत असा दावा करणाऱ्या गुरूच्या अभिरुचीत न शोभणारा हटवादीपणा आहे व त्यामुळे कलाविष्कारप्रवाह गढूळतो हे उघडच आहे. ग्वाल्हेर घराण्यातील बहुसंख्य गायक शंकरा रागात सा रे ग सा अशी जागा फक्त मंद्र-मध्य सप्तकातच घेत राहतात. ही जागा रागाच्या चेहऱ्यामोहऱ्यात इतरत्र येत नसल्याने सुजलेल्या नाकाच्या शेंड्याचे स्वरूप त्यास येते असे म्हटल्यास ती 'विनोदी' वाटण्याचा संभव आहे. पण ही जागा सारखी बोचत राहते व त्यामुळे एकंदर रागस्वरूप दूषित भासते (व पर्यायाने कलाविष्कारात हीण मिसळते) ही गोष्ट एक अनुभवजन्य सत्य आहे.

**दुसरे वैशिष्ट्य**

गुरूसारखे गाणे म्हणजे गाणे शिकणे नसून गुरुद्वारा गाणे पाहणे म्हणजे गाणे शिकणे ही समज देणे हे गुरूचे दुसरे वैशिष्ट्य होय. अर्थात् शिष्यास प्रारंभावस्थेत हुबेहुब नक्कल वठविण्यास सांगणे हे अपरिहार्य असते ही गोष्ट अगदी सत्य आहे. 'आर्ट इज इमिटेशन' हे ॲरिस्टॉटलप्रणीत सूत्र या संदर्भात अक्षरशः खरे आहे. पण नकलेचा हा पांगुळगाडा लवकरात लवकर शिष्य सोडील याची काळजी घेणे, त्यासाठी योग्य ती खबरदारी घेणे हे गुरूचे कर्तव्य होय. गाणे म्हणजे इमानदार नक्कल नसून नकलेच्या साहाय्याने अस्सलाशी इमान असते याची जाणीव गुरूला असल्यास तो ही खबरदारी घेईलच. त्याच्या स्वतःच्या कलाजाणीवेतच हे अंतर्भूत आहे. पण या जाणीवेचा आढळ किती वेळा होतो? आपल्या पट्टीत शिष्याला गावयास लावणे, आपल्या खोडी शिष्यात येत असता तिकडे दुर्लक्ष करणे ही गुरूच्या अ-गुरूपणाचीच निदर्शक होत. कै. गुरू वझेबुवांचे शिष्य जर त्यांच्यासारखेच उंच पट्टीत गात राहिले नसते तर सर्वकाल, सर्व राग ताणून गायला लागल्यामुळे आविष्कारात येणारा एक प्रकारचा उग्र बटबटीतपणा टाळता आला नसता काय? किराना घराण्यातल्या बऱ्याच गायकांना आपला स्वर तानेत पार सुटतो याची जाणीव नसेल काय? गमकेच्या नावाखाली सर्व स्वरकेंद्रे पदच्युत होऊन स्वरराज्यात माजविले जाणारे हे अराजक आविकाराच्या एकंदर स्वरेलपणास किती विकृतपणा आणते याची कल्पना किरान्यासारख्या स्वरवेड्यांना नसेलच असे कसे म्हणावे? मग शिष्यांनी याबाबतीत 'किराने'पण टाकून दुसरीकडे पाहावे. निदान किरानेपणच गायनात सर्वत्र चालवावे असे का सांगितले जात नाही? गुरूसारखे गाणे (आवाज काढणे, तोंड, गळा, छाती इ. च्या विशिष्ट हालचाली करणे) म्हणजेच गाणे असा गैरसमज मुळाशी असल्याने शिष्याची कलाजाणीव किडकी होते व परिणामतः आविष्कारही एकांगी वा शक्य त्याहीपेक्षा हीन दर्जाचा होतो.

गुरूची नक्कल म्हणजे अस्सल गाणे नव्हे या श्रेष्ठ गुरुतत्त्वाचाच दुसरा आविष्कार म्हणजे कलाक्षेत्रातील व्यक्तिस्वातंत्र्य व साधनभिन्नता याची गुरूला असलेली जाणीव होय. आपले तेच गाणे, या व्यतिरिक्त गाणे दुसरे असूच शकत नाही असा आग्रह कोणत्याही संगीतसाधकाचा असू नये. संगीतसिद्धीचे अनेक मार्ग आहेत व या मार्गात श्रेष्ठ-कनिष्ठता नाही. भिन्न भिन्न प्रवृत्तींनी प्रभावित होऊन गायनक्षेत्राचे साकल्याने व्यवस्थितीकरण करण्याचे मार्ग म्हणजे विविध घराणी होत हे साधनभिन्नतेच्या तत्त्वाचे स्पष्टीकरण होय.

त्याचप्रमाणे आवाज, प्रकृती यांनुसार व्यक्तीव्यक्तींच्या आविष्कारपद्धतीत बदल होतो व हा बदल न्याय्य आहे. असा बदल असणे हे स्वाभाविक नव्हे तर हितकरसुद्धा असते. याची जाणीव असणे म्हणजे व्यक्तिस्वातंत्र्याच्या तत्त्वास संगीतक्षेत्रात मिळालेली मान्यता होय.

**फुल्या मारण्याचे कोते लक्षण**

पण महाराष्ट्रात एका घराण्यातील लोक दुसऱ्याविषयी बरे बोलताना ऐकल्यास ऐकणाऱ्याने स्वतःस चिमटा काढून बघावा. अष्टौप्रहर गुरूच्या तोंडून, दुसऱ्या घराण्यास 'गाणे म्हणजे काय हे कळलेच नाही मग प्रत्यक्ष येणे तर दूरच राहिले' या प्रकारची निश्चितार्थी विधाने ऐकली की संगीतसिद्धीच्या या दुसऱ्या मार्गाविषयी सहिष्णू वृत्ती निर्माण व्हावी कशी? उदाहरणार्थ तीव्रीकरण व रागविस्तार या दोन भिन्नभिन्न प्रवृत्तींनी प्रभावित होऊन किराना-आग्रा व ग्वाल्हेर-जयपूर ही घराणी अनुक्रमे आपला संगीतसंसार चालवितात, पण दोन्ही प्रवृत्ती अंतिम संगीतसिद्धीसाठीच कार्यान्वित होत असतात हे जर लक्षात आले तर कोणतेही घराणे फक्त आपल्याच संदर्भात श्रेष्ठ वा कनिष्ठ कसे ठरविता येईल? स्वतःला कोणता मार्ग, कोणते घराणे हवे ते आपण आपल्या कलानुसार ठरवावे व तशी संगीतसाधना करावी; पण यापलीकडे स्वेतर मार्गावर फुल्या मारीत सुटणे हे कोत्या संगीतदृष्टीचे लक्षण होय व महाराष्ट्रातील बहुतेक गायनगुरू या दोषास पात्र आहेत. अर्थात शिष्य स्वतः जर लवकर कान उघडून ऐकू लागला तर तो दुसरे घ्यावे, आपले बदलावे ही क्रिया करीत राहतोही. पण सध्या हे सारे अवघडलेपणे करावे लागते. जर या बाबतीत गायनगुरू अधिक डोळस झाले, वैयक्तिक पसंती ही संगीतव्यवहारातील एक निखळ सत्य म्हणून मांडीनासे झाले तर शिष्यांच्या डोळ्यावरचे रंगीत चष्मे लवकर निघतील व कलाव्यवहार अधिक सहज, स्वाभाविक, मुक्त व पर्यायाने संपन्न होईल.

**सैनिकीकरणाचे भूत**

हे झाले साधनभिन्नतेविषयी. व्यक्तिस्वातंत्र्याविषयी बोलावयाचे तर असे म्हणता येईल की घराण्याची शिस्त लावताना शिष्याच्या आवाजाचा नैसर्गिक गुणधर्म (टिंबर) बदलून जाऊ नयेत याची जाणीव व खबरदारी गुरूने घेतली पाहिजे. शैली व घराण्याची शिस्त एक नव्हे. शैली वेगळी असून घराण्याची शिस्त कायम राहू शकते. घराण्याचे इमान या गोष्टीच्या रणगाड्याखाली सर्व व्यक्तिवैशिष्ट्यांचा चूर करून टाकण्याचा हा भयानक प्रकार थांबलाच पाहिजे. आग्रा घराण्यात शिकलेल्या गायिका पुरुषी आवाजात का गाऊ लागाव्यात? स्त्रियांच्या आवाजातील नैसगिक गुणधर्म हा काही संगीतसिद्धीच्या मार्गातील अडथळा नव्हे. आकाराने गावयाचे याचा अर्थ आवाज इतका मोकळा करावयाचा की त्यामुळे साऱ्या स्वररेषा रुंदट व बिनटोकाच्या, बिनधारेच्या वाटू लागाव्यात यात काय स्वारस्य आहे? पण असे महाराष्ट्रात घडते. उस्ताद अमीर हुसेन यांचे सर्वच शिष्य सारखे वाजवितात असे का? गायनक्षेत्रात शिरलेल्या या सैनिकीकरणाच्या भुताचे जितके लवकर उच्चाटन होईल तितके अंतिम संगीतविकासाच्या दृष्टीने बरे.

या साऱ्या विवेचनात गुरूवर टाकलेली जबाबदारी मोठी आहे. पण गुरूचे स्थानच मोठे आहे. फक्त मुगुट हवा, काटे नकोत असे फक्त संगीतशाळांतील सरसकट मास्तर म्हणू शकतील; पण आपला अनुभव, आपला व्यासंग व आपली परंपरा वा वारसा यांचे संचित पाठीशी घेऊन संगीतसेवेस बद्धपरिकर झालेल्या गुरुसच ही जबाबदारी पार पाडणे शक्य आहे. एकजात सर्व गुरूंनी ही जबाबदारी टाळली आहे असे इथे सुचवायचे नाही, पण अजुनही अधिक डोळस होणे गुरूंना शक्य आहे आणि ते आवश्यकही आहे. संगीतक्षेत्रात जशी बुवाबाजी आहे तशीच गुरुबाजीही पण बोकाळली आहे हा इतर क्षेत्रांच्या अभ्यासकांनी घेतलेला आक्षेप धुवून काढण्यास आपले गुरुत्व  नीट जाणणारे गुरू हवेत, हेच खरे.

---